**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीत देशातल्या जनतेचा कल पुन्हा राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या बाजूनं, पण बहुमताचा आकड्यापासून भाजपा अद्याप दूर
- देशात इंडिया आघाडीला २३३ जागा, काँग्रेस शंभरीच्या उंबरठ्यावर
- राज्यातल्या नागरिकांची महाविकास आघाडीला पसंती, १३ जागांसह काँग्रेस राज्यातला सर्वात मोठा पक्ष होण्याच्या मार्गावर
- नितीन गडकरी, पीयूष गोयल, नारायण राणे, संदीपान भुमरे यांना मतदारांचा कौल/ रावसाहेब दानवे, सुधीर मुनगंटीवार, कपिल पाटील, भारती पवार हे पराभवाकडे
- देशातल्या नागरिकांनी लोकशाही कौल दिल्याची काँग्रेसची प्रतिक्रिया, तर जनता विकासाच्या बाजूनं असल्याचं मुख्यमंत्र्यांचं मत

  **आणि**
- देशातल्या शेअर बाजारात मोठी पडझड, काल कमावलेल्या तेजीच्या तुलनेत सुमारे दुप्पट घसरण

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीची मतमोजणी आज सुरू आहे. दिवसभराच्या मतमोजणीनंतर सर्व म्हणजे ५४३ जागांचे कल स्पष्ट झाले आहेत. यातल्या अनेक जागांवरचे निकाल जाहीर झाले आहेत.

भाजपाने सर्वाधिक ८९ जागा जिंकल्या असून १५० जागांवर ते आघाडीवर आहेत. काँग्रेसने ३७ जागा जिंकल्या असून ६२ जागांवर ते आघाडीवर आहेत. समाजवादी पक्षाने आतापर्यंत चार जागांवर विजय मिळवला आहे. तर ३४ जागांवर पक्षाचे

उमेदवार आघाडीवर आहेत. तृणमूल काँग्रेसने दोन जागा जिंकल्या असून २७ जागांवर ते आघाडीवर आहेत.

देशातल्या महत्वाच्या पक्षांची विजयी आणि आघाडीवर असलेल्या उमेदवारांची संख्या अशी आहे…

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष एका जागेवर विजयी ८ जागांवर आघाडीवर

राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्ष ७ जागांवर आघाडीवर

द्रविड मुन्नेत्र कळघम २२ जागांवर आघाडीवर

तेलुगु देसम एका जागेवर विजय १५ जागांवर आघाडी

जेडीयू १२ जागांवर आघाडीवर

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष दोन जागांवर विजयी दोन जागांवर आघाडी

आरजेडी ३ जागांवर तर झारखंड मुक्ती मोर्चा ३ जागांवर आघाडीवर

आम आदमी पार्टी एका जागेवर विजय मिळवत दोन जागांवर आघाडी घेतली आहे

भाकप आणि भाकप मार्क्सवादी लेनिनवादी प्रत्येकी दोन जागांवर आघाडीवर आहेत.

**<><><><><>**

या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीनं मोठी मुसंडी मारली आहे. आतापर्यंत ५ जागांचे निकाल जाहीर झाले आहेत. त्यात भाजपानं २, तर काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, अजित पवार यांच्या नेतृत्वाखालची राष्ट्रवादी काँग्रेस, आणि शिवसेना या पक्षांनी प्रत्येकी एक जागा जिंकली आहे. याशिवाय १२ जागांवर काँग्रेसचे उमेदवार आघाडीवर आहेत. शिवसेना उद्धव

बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार ९ जागांवर, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार ७ मतदारसंघांमधे आघाडीवर आहेत. तर महायुतीमधे भाजपा ८, आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालच्या शिवसेनेचे उमेदवार ६ मतदारसंघांमधे आघाडीवर आहेत.

गेल्या, म्हणजे २०१९ च्या निवडणुकीत राज्यातल्या ४८ पैकी ४१ जागा भाजपा-शिवसेना युतीनं जिंकल्या होत्या. त्यात भाजपाला २३, तर शिवसेनेला १८ जागा मिळाल्या होत्या. राष्ट्रवादी काँगेसला ४, तर काँगेसला फक्त एक जागा जिंकता आली होती. औरंगाबादमधे एमआयएमचे इम्तियाज जलील, तर अमरावती मतदारसंघातून नवनीत राणा अपक्ष म्हणून निवडून आल्या होत्या. यावेळी त्या याच मतदारसंघातून भाजपाच्या उमेदवार होत्या, त्या पिछाडीवर आहेत.

पक्ष फुटल्यानंतर शिवसेनेतून १३ खासदार एकनाथ शिंदे यांच्या सोबत गेले होते. राष्ट्रवादी काँग्रेसमधून १ खासदार, सुनील तटकरे अजीत पवार यांच्यासोबत गेले होते. यावेळीही ते रायगड मतदारसंघातून विजयी झाले आहेत. मात्र त्यांच्याव्यतिरिक्त अजित पवार यांच्या नेतृत्वाखालच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या इतर कोणत्याही उमेदवाराला विजय किंवा विजयी आघाडी मिळवता आलेली नाही. २८ जागा लढवणाऱ्या भाजपाला फक्त १०, तर १५ जागा लढवणाऱ्या, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालच्या शिवसेनेला ७ जागा मिळत असल्याचं दिसत आहे. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत यावेळी भाजपाप्रणित महायुतीच्या जागा निम्म्यापेक्षा कमी होताना दिसत आहेत. तर गेल्या वेळी एका जागेवर समाधान मानावं लागलेल्या काँग्रेसला १३ जागा मिळून तो राज्यातला पहिल्या क्रमांकाचा मोठा पक्ष ठरेल, असं चित्र आहे. उद्धव ठाकरे यांच्यासोबत ५ खासदार राहिले होते, ही संख्या आता ९, म्हणजे जवळजवळ दुप्पट होताना दिसतेय. तर शरद पवार यांच्याकडे फक्त ३

खासदार उरले होते, त्यांच्या जागा ७, म्हणजे दुपटीपेक्षा जास्त वाढत असल्याचं दिसत आहे.

सांगलीत अपक्ष म्हणून निवडणूक लढवणारे काँग्रेसचे बंडखोर विशाल पाटील एक लाखापेक्षा जास्त मतांनी आघाडीवर आहेत.

राज्यातल्या अनेक लढती लक्ष्यवेधी ठरल्या. अत्यंत प्रतिष्ठेच्या ठरलेल्या बारामती लोकसभा मतदार संघात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सुनेत्रा पवार यांच्यावर निर्णायक आघाडी घेतली आहे.

**नागपूर**मध्ये भाजपाचे नितीन गडकरी यांनी निर्णायक आघाडी घेतली आहे.

**अहमदनगर** मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे निलेश लंके आघाडीवर असून त्यांनी त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी भाजपाचे विद्यमान खासदार सुजय विखे पाटील यांच्यावर मोठी आघाडी घेतली आहे.

**अमरावती**मध्ये भाजपाच्या नवनीत राणा पिछाडीवर आहेत, तर बीडमधे भाजपाच्या पंकजा मुंडे यांनी मोठी आघाडी घेतली आहे.

**रायगड** मतदारासंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सुनील तटकरे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनंत गीते यांच्यावर ८२ हजार ७८४ मतांनी विजय मिळवला आहे.

**रत्नागिरी-सिंधुदुर्ग** मतदारसंघात भाजपाचे उमेदवार नारायण राणे विजयी झालेत.

**दक्षिण मध्य मुंबईत** अनिल देसाई यांना विजयी घोषित करण्यात आलं आहे.

**जालना** मतदार संघात भाजपाचे विद्यमान खासदार रावसाहेब दानवे यांची पीछेहाट होताना दिसत आहे, तर दिंडोरीमध्ये केंद्रीय राज्य मंत्री, भाजपाच्या भारती पवार या देखील मागे पडल्या आहेत.

**उत्तर मुंबई** मतदारसंघात भाजपाचे उमेदवार पीयूष गोयल यांनी सुमारे साडे लाख मतांची निर्णायक आघाडी घेतली आहे. उत्तर मध्य मुंबईत मात्र भाजपाचे उज्ज्वल

निकम पिछाडीवर आहेत. या मतदार संघात कॉंग्रेसच्या वर्षा गायकवाड यांनी मोठी आघाडी मिळवली आहे.

**दक्षिण मुंबई** मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत विजयी झाले आहेत.

**सातार्‍यात** भाजपाचे उदयनराजे भोसले, पुण्यात भाजपाचे मुरलीधर मोहोळ, तर सोलापूरमध्ये काँग्रेसच्या प्रणिती शिंदे आघाडीवर आहेत. ठाण्यात शिवसेनेच्या नरेश म्हस्के यांनीही निर्णायक आघाडी घेतली आहे.

**<><><><>**

लोकसभेच्या गेल्या निवडणुकीच्या तुलनेत २०२४ च्या निवडणुकीत, शिवसेनेची मतं दोन पक्षांमधे विभागली गेल्यामुळे मुंबई आणि कोकण विभागात काहीसं संमिश्र चित्र पहायला मिळत आहे. या विभागातल्या १३ मतदारसंघांपैकी २०२४ च्या निवडणुकीत शिवसेनेच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला ४ जागांवर, शिवसेनेला ३ जागांवर तर काँग्रेस आणि भाजपाची प्रत्येकी तीन जागांवर सरशी झाली आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत या१३ मतदारसंघांमधे शिवसेनेनं ८ जागा जिंकल्या होत्या तर भाजपानं केवळ चार जागांवर विजय मिळवला हाेता तर राष्ट्रवादी काँग्रेसशी फक्त एका जागेवर सरशी झाली होती.

**रत्नागिरी-सिंधुदुर्ग** मतदारसंघात एकोणिसाव्या फेरीअखेर भाजपाचे उमेदवार नारायण राणे विजयी झाले आहेत.

**उत्तर मुंबई** मतदारसंघात भाजपाचे उमेदवार पीयूष गोयल तीन लाखांहून अधिक मतांनी आघाडीवर आहेत. २०१९ च्या निवडणुकीत या मतदारसंघातून भाजपाचेच गोपाळ शेट्टी निवडून आले होते.

**दक्षिण मध्य मुंबई**तून शिवसेना उद्धव बाळासाहेब गटाचे अनिल देसाई यांनी शिवसेनेचे विद्यमान खासदार राहुल शेवाळे यांचा ५३ हजार ३८४ मतांनी पराभव केला आहे. देसाई यांना ३ लाख ९५ हजार १३८ मतं मिळाली तर शेवाळे यांना तीन लाख ४१ हजार ७५४ मतं मिळाली आहेत.

तर **उत्तर मध्य मुंबई**त काँग्रेसच्या उमेदवार वर्षा गायकवाड आघाडीवर असून त्यांना त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी भाजपाचे उज्ज्वल निकम यांच्यावर १६ हजार ३१ मतांनी आघाडी घेतली आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत या मतदारसंघातून भाजपाच्याच पूनम महाजन विजयी झाल्या होत्या.

**ईशान्य मुंबई**त शिवसेना उद्धव बाळासाहेब गटाचे संजय दिना पाटील २३ हजार ९१९ मतांनी आघाडीवर आहेत. भाजपाचे उमेदवार मिहीर कोटेचा पिछाडीवर आहेत. गेल्या लोकसभा निवडणुकीत या मतदारसंघातून भाजपाचे मनोज कटक विजयी झाले होते.

**वायव्य मुंबई**तले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अमोल कीर्तिकर ९ हजार ३१० मतांनी आघाडीवर आहेत. शिवसेनेचे रवींद्र वायकर पिछाडीवर आहे. गेल्या निवडणुकीत या मतदारसंघातून शिवसेनेचे गजानन किर्तीकर विजयी झाले होते.

**दक्षिण मुंबई** मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत ५२ हजार ६७३ मतांनी विजयी झाले आहेत. त्यांच्या नजीकच्या प्रतिस्पर्धी शिवसेनेच्या यामिनी जाधव पराभूत झाल्या आहेत. गेल्या निवडणुकीत या मतदारसंघातून शिवसेनेचे अरविंद सावंत विजयी झाले होते.

**ठाणे** मतदारसंघात शिवसेनेचे नरेश म्हस्के आघाडीवर असून त्यांचे नजीकचे प्रतिस्पर्धी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विद्यमान खासदार राजन विचारे पिछाडीवर आहेत.

**कल्याण** मतदारसंघाचे शिवसेनेचे विद्यमान खासदार श्रीकांत शिंदे १ लाख ३१ हजार ८४३ मतांनी आघाडीवर आहेत. शिवसेनेच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वैशाली दरेकर राणे  पिछाडीवर आहेत.

**भिवंडी** मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र गटाचे उमेदवार बाळ्या मामा म्हात्रे आघाडीवर आहेत. त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपाचे विद्यमान खासदार कपिल पाटील आहेत.

**मावळ** मतदारसंघाचे शिवसेनेचे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे विजयी झाले आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब पक्षाचे संजोग वाघेरे पाटील ९६ हजार ६१५ मतांनी पराभूत झाले आहेत.

**पालघर** मतदारसंघात  भाजपाचे  उमेदवार हेमंत सवरा यांनी निकटच्या प्रतिस्पर्धी शिवसेना पक्षाच्या भारती कामडी  यांचा पराभव केला आहे. सवरा यांना पाच लाख ९८ हजार १७५ मतं मिळाली आहेत. गेल्या निवडणुकीत या मतदारसंघातून शिवसेनेचे राजेंद्र गावित विजयी झाले होते.

**रायगड** मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान खासदार सुनील तटकरे विजयी झाले आहेत. त्यांना पाच लाख आठ हजार ३५२ मतं मिळाली आहेत.  त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचेचे अनंत गीते यांना ४ लाख २५ हजार ५६८ मतं मिळाली आहेत.

मध्य आणि पश्चिम महाराष्ट्रात २०१९ सालच्या निवडणुकीत ५ जागा भाजपाला मिळाल्या होत्या तर प्रत्येकी ३ जागांवर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांचे उमेदवार विजयी झाले होते. यंदा हे चित्र चांगलंच बदललं आहे.

भाजपाला या पट्ट्यात केवळ दोन जागा मिळाल्या असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं ४ ठिकाणी आघाडी घेतली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि भारतीय काँग्रेस पक्षाला प्रत्येकी दोन ठिकाणी यश मिळेल असं दिसतंय तर सांगलीची जागा अपक्ष उमेदवारानं पटकावली आहे.

साऱ्या देशाचं लक्ष लागून राहिलेल्या बारामती मतदारसंघाचा गड राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांनी तिसऱ्यांदा काबीज करण्याकडे वाटचाल सुरू केली आहे. राजकीय आखाड्यात पहिल्यांदाच उतरलेल्या सुनेत्रा पवार पराभवाच्या छायेत आहेत.

काँग्रेसचे शाहू छत्रपती यांनी **कोल्हापूर** मध्ये, तर काँग्रेसच्याच प्रणिती शिंदे यांनी **सोलापूर** मध्ये निर्णायक आघाडी घेतली आहे.

**शिर्डी** मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भाऊसाहेब वाकचौरे विजयी झाले असून हातकणंगले इथून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सत्यजित पाटील यांनी आघाडी घेतली आहे.

**अहमदनगर**मध्ये भाजपाचे डॉक्टर सुजय विखेपाटील पिछाडीवर आहेत तिथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे निलेश लंके यांनी आघाडी घेतली आहे.

तर **माढा** मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे धैर्यशील मोहिते पाटील आघाडीवर आहेत.

**सातारा** मतदारसंघात भाजपाचे उदयन राजे भोसले आघाडीवर आहेत. **सांगली** मतदारसंघात अपक्ष विशाल पाटील यांनी बाजी मारली असून **पुणे** मतदारसंघात भाजपाचे मुरलीधर मोहोळ, तर **शिरूर** मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अमोल कोल्हे यांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकत आघाडी घेतली आहे.

**<><><><><>**

**मराठवाड्यात** आठ आणि उत्तर महाराष्ट्रात सहा अशा १४ जागा या दोन्ही विभागात मिळून आहेत. गेल्या लोकसभा निवडणुकीत यातल्या ९ जागांवर भाजपला तर चार जागांवर शिवसेनेला विजय मिळाला होता. तर औरंगाबाद लोकसभा मतदारसंघाची जागा एमआयएम या पक्षाने जिंकली होती. शिवसेनेतल्या फुटीमुळे यावेळची समीकरणं बदलली होती. मराठवाड्यात हिंगोली आणि औरंगाबाद मतदारसंघात दोन्ही शिवसेना आमनेसामने होत्या. तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला केवळ उस्मानाबादच्या एका जागेवरच लढण्याची संधी मिळाली. त्यामुळे युतीवर मागच्या वेळी जिंकलेल्या जागा गमावण्याची वेळ आली.
**औरंगाबाद** लोकसभा मतदारसंघातून १६व्या फेरीनंतर महायुतीचे संदीपान भुमरे ४५ हजार ३१६ मतांनी आघाडीवर आहेत. भुमरे यांना आतापर्यंत दोन लाख ७८ हजार ७०४, एमआयएमचे सय्यद इम्तियाज जलिल यांना दोन लाख ३३ हजार ३८८, तर महाविकास आघाडीचे चंद्रकांत खैरे यांना एक लाख ७२ हजार ९७४ मतं मिळाली आहेत.

मराठवाड्यातल्या **नांदेड**मध्ये भाजपाचे विद्यमान खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्यावर काँग्रेसच्या वसंतराव चव्हाण यांनी २५ हजार ८२३ मतांची आघाडी मिळवली आहे. माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे मातब्बर नेते अशोक चव्हाण यांनी पक्षांतर करूनही इथं काँग्रेसला यश मिळताना दिसत आहे हे विशेष.

**लातूर** लोकसभा मतदारसंघात गेल्या दोन लोकसभा निवडणुकीत भाजपाला यश मिळालं होतं. यावेळी जिल्ह्यातल्या अनेक नेत्यांनी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर पक्षांतर केल्यानंतर मतदारसंघात उमेदवार उभा करणं आणि तो निवडून आणणं हे पक्षासमोरचं आव्हान होतं. भाजपानं सुधाकर श्रृंगारे यांना यावेळी पुन्हा संधी दिली, तर काँग्रेसने डॉ. शिवाजी काळगे यांना येथून उभं केलं. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा काळगे यांनी श्रृंगारे यांच्यावर ६३ हजार ६३४ मतांची निर्णायक आघाडी मिळवली आहे. त्यामुळे नांदेड आणि लातूर हे दोन्ही मतदारसंघ भाजपाकडून काँग्रेसकडे जाण्याची शक्यता दिसत आहे.

दुसरीकडे **जालना** मतदारसंघातही भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे हेही पिछाडीवर आहेत. काँग्रेसच्या कल्याण काळे यांनी त्यांच्यावर ६५ हजार ९२९ मतांची निर्णायक आघाडी मिळवली आहे. १९९८ सालापासून या मतदारसंघातून जिंकणारे दानवे यंदा प्रथमच पराभवाच्या छायेखाली आहेत.

**उस्मानाबाद** आणि परभणी मतदारसंघ राखण्यात, आणि हिंगोली मतदारसंघ शिवसेनेच्या उमेदवाराकडून आपल्याकडे घेण्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवारांना यश आलं आहे. बीड मतदारसंघात भाजपाने चेहरा बदलला असला तरी हा मतदारसंघ राखण्यात पक्षाला यश मिळेल असं दिसत आहे. मात्र, गेल्या लोकसभा निवडणुकीत जवळपास सर्व जागा जिंकणाऱ्या भाजपा-शिवसेना युतीची मराठवाड्यात मोठी घसरण झाली आहे.

उत्तर महाराष्ट्रातला **नंदुरबार** मतदारसंघ भाजपानं गमावला आहे, तर दिंडोरी मतदारसंघातही पक्षाला पराभवाचा सामना करावा लागेल असं दिसत आहे. नंदुरबार मतदारसंघात सलग दोन वेळा निवडून आलेल्या खासदार हिना गावित

यांना यावेळी पराभवाचं तोंड पाहावं लागलं आहे. काँग्रेसचे गोवाल पाडवी यांनी त्यांचा १ लाख ५९ हजारांहून अधिक मतांनी पराभव केला.

**दिंडोरी** मतदारसंघात कांदा उत्पादक शेतकऱ्यांचं प्रमाण मोठं आहे. कांद्याच्या निर्यातबंदी धोरणामुळे या शेतकऱ्यांचा सत्ताधारी पक्षावर विशेषतः मतदारसंघाच्या प्रतिनिधी म्हणून भारती पवार यांच्यावर रोष होता. हा रोष या निवडणुकीत दिसून आल्याचं म्हटलं जात आहे.

**नाशिक** मतदारसंघात शिवसेनेच्या विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांचा पराभव करत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या राजाभाऊ वाजे यांनी विजय मिळवला आहे. तर जळगाव, रावेर आणि धुळे मतदारसंघ राखण्यात मात्र भाजपाला यश आलं आहे.

**<><><><><>**

देशातल्या जनतेने विकासाला मतदान केलं आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिली. नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा प्रधानमंत्री होत असल्याबद्दल शिंदे यांनी त्यांचं अभिनंदन केलं. सत्ताधारी पक्ष संविधान बदलेल असा प्रचार विरोधी पक्षांनी महाराष्ट्रात केला. लोकांचा हा गैरसमज दूर करण्यात आम्ही कमी पडलो. येत्या काळात यात दुरुस्ती करू,असंही शिंदे म्हणाले.

**होल्ड--बाईट--(एकनाथ शिंदे)**

**<><><><><>**

देशानं या निवडणुकीच्या माध्यमातून नरेंद्र मोदी यांना नाकारलं असल्याचं काँग्रेसने म्हटलं आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, माजी अध्यक्ष सोनिया गांधी, राहुल गांधी तसंच ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी आज नवी दिल्लीत

पत्रकारपरिषदेत ही प्रतिक्रीया मांडली. या निवडणूक निकालातून जनतेचा विजय आणि लोकशाहीचा विजय झाला असल्याचं खरगे म्हणाले. कांग्रेसला मिळालेल्या यशाबद्दल त्यांनी मतदारांचे आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले. निवडणुकीच्या माध्यमातून गरीब मतदारांनी संविधानाचं आणि लोकशाहीचं संरक्षण केल्याची प्रतिक्रीया राहुल गांधी यांनी दिली. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा भाग असलेल्या आणि पूर्वी  संयुक्त पुरोगामी आघाडीचे घटक असलेल्या पक्षांशी सत्तास्थापनेसाठी संपर्क साधणार का असा प्रश्न पत्रकारांनी विचारल्यावर त्यांनी सांगितलं की इंडिया आघाडीची बैठक उद्या होणार असून घटक पक्ष एकत्रितपणे याबाबत निर्णय घेतील.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीत काँग्रेस आणि मित्रपक्षांना मिळालेलं यश हे राहुल गांधी यांनी काढलेल्या पदयात्रेचं यश असल्याची प्रतिक्रिया काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केली आहे. लोकसभा निवडणुकीचे कल आल्यानंतर त्यांनी वार्ताहरांशी संवाद साधला. देशात परिवर्तन होऊ शकत नाही, असं चित्र निर्माण केलं जात होतं. या प्रचाराला जनतेनंच उत्तर दिलं आहे. या देशात जनतेपेक्षा कुणी मोठं नाही असं नाना पटोले म्हणाले. काँग्रेसला मोठ्या प्रमाणात मतदान केल्याबद्दल पटोले यांनी राज्यातल्या मतदारांचे आभार मानले. तसंच शाहू - फुले - आंबेडकरांच्या महाराष्ट्राने हा चमत्कार केला असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

**होल्ड--बाईट--(नाना पटोले)**

**<><><><><>**

देशात परिवर्तनाची प्रक्रियी सुरू झाल्याचं लोकसभा निवडणुकीच्या निकालावरून दिसंत. देशपातळीवरचं चित्र आशादायक आहे, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज दिली. लोकसभा

निवडणुकीच्या निकालाचे कल आल्यानंतर शरद पवार यांनी वार्ताहरांशी संवाद साधला,  त्यावेळी ते बोलत होते.

उत्तर प्रदेशात भाजपाला यापूर्वी मोठ्या प्रमाणात यश मिळत होतं. आता त्यांच्या जागा कमी झाल्या आहेत. हिंदी भाषिक राज्यात अधिक लक्ष दिलं तर उत्तरेकडला चेहरा बदलायला वातावरण अनुकूल आहे, असं पवार म्हणाले. देशाचं राजकारण चुकीच्या मार्गानं जात होतं. त्यामुळे जनतेनं धडा शिकवला, असंही ते म्हणाले. राज्यात पक्षाला यश मिळाल्याबद्दल शरद पवार यांनी मतदारांचे आभार मानले. हे यश एकट्याचं नसून महाविकास आघाडीतल्या मित्रपक्षांचं एकत्रित यश असल्याचंही पवार म्हणाले.

लोकसभा निवडणुकीचे कल स्पष्ट झाल्यानंतर आपण काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि माकपचे सरचिटणीस सीताराम येचुरी यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधल्याचं त्यांनी सांगितलं. उद्या दिल्लीत इंडिया आघाडीची बैठक होणार आहे. या बैठकीत चर्चा करून पुढचं धोरण ठरवलं जाईल, असंही पवार म्हणाले.

**<><><><><>**

अयोध्येत राम मंदिर बांधून सुद्धा तिथला भाजपाचा उमेदवार पराभूत झाला. त्यामुळे लोकांच्या मनात मंदिराबाबत श्रद्धा आहे, पण लोक त्यावर मत देत नाहीत हे स्पष्ट झालं, असं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले. लोकसभा निवडणूक निकालाच्या पार्श्वभूमीवर ते वार्ताहरांशी बोलत होते. देशात कोणासोबत जायला हवं हे महाराष्ट्रातल्या जनतेनं दाखवून दिलं असंही जयंत पाटील यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

रायगड लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार सुनिल तटकरे यांचा विजय मिळवला. हा विकासाचा विजय असल्याची प्रतिक्रिया यावेळी सुनिल तटकरे यांनी समाजमाध्यमाद्वारे व्यक्त केली. लोकसभेची उमेदवारी दिल्याबद्दल तटकरे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, अमित शहा आणि अजित पवार यांचे आभार मानले.

दरम्यान, राष्ट्रवादीला मतदान केल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्त उमेश पाटील यांनी मतदारांचे आभार मानले आहेत. रायगड मतदारसंघातल्या विजयाबद्दल आनंद व्यक्त करतानाच बारामती मतदारसंघातला पराभव आपण स्वीकारत असल्याचं पाटील म्हणाले.

**<><><><><>**

आजच्या निकालाविषयी भाजपा प्रवक्ते विश्वास पाठक यांनी आकाशवाणीकडे प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

**विकास पाठक--होल्ड--बाईट**

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजारात आज मोठी पडझड नोंदवण्यात आली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आणि निफ्टीत पाच टक्क्यांहून अधिक घट झाली.

आज सकाळी बाजाराच्या कामकाजाला सुरुवात झाली तेव्हाच बाजारात घसरणीला सुरुवात झाली.

पहिल्या सत्रात सेन्सेक्स १ हजार ७०० अंकांनी तर निफ्टी ५०० अंकांनी कोसळला. ही पडझड दुसऱ्या सत्रातही कायम राहिली.

दिवसअखेर सेन्सेक्स ४ हजार ३९० अंकांची घसरण नोंदवत ७२ हजार ७९ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १ हजार ३७९ अंकांची घसरण नोंदवत २१ हजार ८८४ अंकांवर बंद झाला.

शेअर बाजारात झालेल्या या पडझडीमुळे गुंतवणूकदारांचं सुमारे १० लाख ३२ कोटी रुपयांचं नुकसान झाल्याचा अंदाज आहे. कोरोनानंतर भारतीय शेअर बाजारात झालेली ही सर्वात मोठी पडझड आहे.

**<><><><><>**

राज्यात महायुतीने मैदानात उतरवलेल्या विद्यमान खासदारांपैकी फक्त सात खासदार आपापल्या मतदारसंघात आघाडीवर आहेत. श्रीकांत शिंदे, श्रीरंग बारणे, सुनील तटकरे, धैर्यशील माने, प्रतापराव जाधव, नितीन गडकरी आणि रक्षा खडसे वगळता महायुतीचे इतर सर्व विद्यमान खासदार सध्या पिछाडीवर असल्याचं चित्र आहे.

तर महाविकास आघाडीकडून पुन्हा संधी मिळालेल्या सात विद्यमान खासदारांपैकी पाच खासदार आघाडीवर आहेत. यात सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे, अरविंद सावंत, ओमप्रकाश राजेनिंबाळकर आणि संजय जाधव यांचा समावेश आहे. उर्वरित दोघे, म्हणजेच राजन विचारे आणि विनायक राऊत पिछाडीवर आहेत.

**<><><><><>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अभिषेक मनु सिंघवी आणि सलमान खुर्शीद यांनी आज नवी दिल्ली इथं केंद्रीय निवडणूक आयोगाची भेट घेतली. मतमोजणीची माहिती दुपारी अडीचनंतर आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात विलंब होत असल्याची तक्रार कार्यकर्त्यांनी केल्याचं त्यांनी  आयोगाला सांगितलं. त्यावर ही माहिती मिळाल्याबरोबर ताबडतोब संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल असं आयोगानं स्पष्ट केलं.

**<><><><><>**

भाजपा युवा मोर्चाचे सदस्य असणारे प्रवीण नेत्तारू यांची कर्नाटकात हत्या प्रकरणातला आरोपी रियाझ हारल्ली  याला आज मुंबई विमानतळावर अटक करण्यात आली. तो गेले महिने पोलिसांना गुंगारा देत होता. आज तो परदेशात पळून जाण्याच्या प्रयत्नांत असताना राष्ट्रीय तपास संस्थेनं त्याला अटक केली. यामुळे ऑगस्ट २०२२ मध्ये झालेल्या या हत्याकांडातल्या अटक केलेल्या आरोपींची संख्या आता १९ झाली आहे.

**<><><><><>**

हिंदुस्तान एयरोनॉटिक्स लिमिटेडचं सुखोई लढाऊ विमान आज नाशिक जिल्ह्यात शिरसगाव इथल्या द्राक्ष बागेत कोसळलं. विमानात अचानक तांत्रिक बिघाड

झाल्यानं वैमानिकांनी ते धावपट्टीच्या दिशेनं नेण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यापूर्वीच ते कोसळून त्यानं पेट घेतला. विमानात बिघाड झाल्याचं लक्षात येताच दोन्ही वैमानिकांनी पॅराशूटद्वारे खाली झेप घेतल्यानं या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

**<><><><><>**

सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत दिग्गज भारतीय खेळाडू आज इंडोनेशियाची राजधानी जकार्ता इथं आपापले सामने खेळणार आहेत. लक्ष्य सेन, एच.एस. प्रणॉय, किदाम्बी श्रीकांत, प्रियांशू राजावत आणि किरण जॉर्ज यासारखे अव्वल भारतीय खेळाडू पुरुष एकेरीत उतरतील. मिश्र दुहेरीत एन. सिक्की रेड्डी आणि बी.सुमीत रेड्डी ही जोडी आणि महिला दुहेरीत ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद ही जोडीही मैदानात उतरणार आहेत.

दरम्यान, उद्या होणाऱ्या महिला दुहेरीच्या सामन्यात तनीषा क्रॅस्टो आणि अश्विनी बोपण्णा तसंच श्वेतापर्णा पांडा आणि ऋतुपर्णा पांडा या बहिणी सहभागी होणार आहेत. महिला एकेरीत पी व्ही सिंधु, आकर्षी कश्यप तर पुरुष एकेरीत चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रांकीरेड्डी खेळणार आहेत.

**<><><><><>**

नैर्ऋत्य मोसमी पाऊस अरबी समुद्राच्या आणखी काही भागत पसरला असून दक्षिण महाराष्ट्राच्या काही भागात तो येत्या काही तासात पोहोचण्यासाठी स्थिती अनुकूल आहे.

गेल्या २४ तासात विदर्भात काही ठिकाणी तर कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकण मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता असल्याचं पुणे वेधशाळेच्या हवामानवृत्तात म्हटलं आहे.

//<><><><><>//